विवाहपूर्व समुपदेशन किती उपयोगाचे?

- मेघा आणि अक्षय – दोघांचे लग्न होऊन सात आठ महिने झाले होते. त्यांच्यात कुरबुर सुरु होऊन देखील २/३ महिने झाले होते. छोट्या छोट्या कारणावरून दोघांमध्ये बरेच मतभेद होते. त्याला व्यवस्थितपणा आवडायचा तर तिला त्याची अजिबातच सवय नव्हती. तिला असं वाटे त्याने तिच्या आईला रोज फोन करावा तर तो म्हणे रोज काय करायचं फोन? दर  तीन चार दिवसांनी करीन फोन. ते तिला पटत नव्हते.

अक्षय ला वाटे तिने रोज आनंदी असावे. पण तिला रोज काहीना काहीतरी होत असायचे. कधी पाठ दुखते, तर कधी सर्दीच झालेली असायची, तर कधी डोकं दुखत असे. अशा अनेक लहान लहान कारणांवरून दोघांचे खटके उडत असत. कालांतराने या लहान  लहान भांडणांनी मोठे स्वरूप धारण केले होते.

- सुमेध च्या घरी तर निराळीच तऱ्हा. सुमेध ची बायको नेहा तीही नोकरी करत होती. झाले असतील लग्नाला ८/१० महिने. पण अद्याप तिने त्याला स्वतःचा  पगार सांगितला  नव्हता. सुमेधने  घरासाठी कर्ज काढले होते.

कर्जाचा हप्ता बऱ्यापैकी होता. त्याला वाटे तिने घरातील काही खर्चाचा भाग उचलावा. पण नेहाचे म्हणणे घर चालवण्याची जबाबदारी पूर्णपणे त्याचीच आहे. त्याचा  डोळा माझ्या पैशावर का ? माझ्या पैशाचं नियोजन मीच करणार. त्याने मला माझ्या पैशाबद्दल काहीही  विचारता कामा नये. सुमेधने तिला खूप वेळा सांगून पहिले पण नेहा अजिबातच ऐकायला तयार नव्हती. परिणामी त्यांच्या नात्यात खूप अंतर पडले होते.

ही उदाहरणे अगदी प्रातिनिधिक आहेत. अनेकांना वाटेल की इतक्या छोट्या कारणांवरून घटस्फोटापर्यंत वेळ कशी काय येऊ शकते? पण कोणत्याही वादाची सुरुवात एका लहानशा बीजापासूनच होत असते. आणि फमिली कोर्टातली आकडेवारी असं सांगते की बहुतेक घटस्फोट हे अगदी लहानसहान कारणांमुळे आणि नंतर इगो वाढल्यामुळेच झाले आहेत.

विवाहोत्तर समुपदेशनासाठी अनेक जोडपी येत असतात, त्यातल्या बहुतेक उदाहरणांमध्ये जाणवते की अरे हे लग्नाआधी आले असते समुपदेशनासाठी तर ही लग्ने वाचवता आली असती.  वर दिलेल्या दोन्ही उदाहरणांमध्ये

नीट बारकाईने पहिले तर हे जाणवू शकेल. लग्नापूर्वीच आपल्या काही धारणा तपासून पाहिल्या तर ही बाब सहज लक्षात येऊ शकते.

विवाहपूर्व समुपदेशनाची सध्याच्या काळात नितांत गरज असल्याचे जाणवते. पण एकूणच समुपदेशनाच्या बाबतीत आपल्याकडे बरेच गैरसमज आहेत. काहीतरी बिनसल्यानंतरच समुपदेशनासाठी जायचे असते असा एक सार्वत्रिक समज आहे. किंबहुना समुपदेशक् असं काय वेगळ सांगणार आहेत, अशीही एक विचारधारा जाणवते. खरं तर विवाहपूर्व समुपदेशनामुळे वधू वर यांच्या विचारांना एक दिशा मिळते. नेमका  काय विचार करायला पाहिजे, ते लक्षात येतं. लग्नापूर्वीच कोणकोणत्या गोष्टींबद्दल आवर्जून बोललं पाहिजे ते समजत. विवाहपूर्व समुपदेशन हे preventive आहे. नंतर कदाचित निर्माण होणाऱ्या प्रश्नाचं आधीच निवारण करणारं आहे.

रोज फमिली कोर्टात २५ ते ३० नव्या केसेस घटस्फोटासाठी दखल होत आहेत. त्यातल्या किमान निम्म्या केसेस पुण्या मुंबईतल्या आहेत. आणि त्यापैकी बरीचशी कारणे ही अगदी क्षुल्लक असल्याचे दिसते.

या प्रकारची आकडेवारी अनेकदा वर्तमानपत्रात प्रसिद्ध होत असते. आसपास घडणाऱ्या घटस्फोटांची खबर आपल्या कानावरही येत असते.  आता पूर्वीसारखे घटस्फोट क्वचित घडणारे नाहीत, तर  कदाचित आपल्या दरवाज्यापर्यंत

येऊन ठेपले आहेत, असे असून सुद्धा विवाहपूर्व समुपदेशनासाठी येणाऱ्यांची संख्या अगदी नगण्य असते. गेल्या काही वर्षात यात बदल झाला  असला  तरीही अजून त्याबद्दल गैरसमज खूप आहेत. आता मला लग्न करायचे आहे तर त्याबद्दल काहीतरी शिकावं, समजून घ्यावं असं वाटून त्याबद्दल चर्चा करायला येणारे वधू वर त्यामानाने कमी आहेत.

प्रेम विवाह असो किंवा ठरवून केलेला  विवाह असो जोपर्यंत पती पत्नी २४ तास एकत्र राहायला सुरुवात करत नाहीत तोपर्यंत एकमेकांच्या स्वभावाचा अंदाज येणं तसं कठीणच असतं.  लग्नाच वयही तसं पूर्वीपेक्षा आता पुढे गेलं आहे. साधारणपणे २५ ते २८ या वयात मुली आणि २८ ते ३२ या वयात मुळे लग्नासाठी तयार असताना दिसून येतात. त्यामुळे त्यांची मते पक्की झालेली असतात. स्वभावातली लवचिकता त्यामानाने कमी झालेली दिसते. स्वतःचे इगो प्रखर झाल्याचे दिसून येतात. तसेच वधू आणि वर या दोघांच्याही आई वडिलांची त्यांच्या संसारात असलेली ढवळाढवळ , कामाच्या वाढलेल्या वेळांमुळे एकमेकांना वेळ देता  न येणं, लैंगिक पूरकता नसणं,  जीवनशैलीत झालेला  बदल, आणि त्यातली तफावत  अशी अनेक कारणे घटस्फोटाची सांगता येतील.

यापैकी अनेक कारणांवर विवाहपूर्व समुपदेशनाच्या माध्यमातून चर्चा करता येते. स्वतःची मते तपासता येतात.

वर दिलेल्या उदाहरणामध्ये आर्थिक बाबींबद्दल लग्नापूर्वीच बोलता आले असते. कर्जाच्या रक्कमे बद्दल ही आधीच चर्चा करता आली असती.

प्रत्येक लग्नेच्छू व्यक्तीने  स्वतःच्या आणि आपल्या भावी  जोडीदाराच्या कल्पना जाणून घ्यायला हव्यात.. प्रत्येल मुलाने आणि मुलीने आपल्या जिव्हाळ्याच्या गोष्टी तपासून पाहायला हव्यात, आधी त्याबद्दल विस्तृत चर्चा व्हायला हवी.

सुचित्रा अशीच एक दिवस अचानक आली होती. दोन दिवसापूर्वीच अमोघ नावाच्या एका मुलाला भेटली होती.

सुचित्रा च्या पायावर घोट्या जवळ एक पांढरा डाग होता.  सुचित्राने ही गोष्ट अमोघ ला सांगितली नव्हती. हे सांगितले तर अमोघ नकार देईल अशी तिला भीती वाटत होती. आणि अमोघ तिला फारच आवडला होता. त्याबद्दलच ती बोलायला आली होती . मी तिला म्हटलं," अग जे नातं विश्वासाच्या पायावर मजबूतपणे उभं राहायला हवं, तिथे खोट्याचा आधार घ्यायचा  नाही.

आणि हे ऐकून जर त्याने नकार दिला  तरी चालेल, मग तो आपल्यासाठी नव्हताच असंही लक्षात घे. पण नात्यात प्रामाणीकपणा खुपच महत्वाचा  ठरतो. "

लग्न ठरण्यापूर्वी आणि लग्न ठरल्यानंतर दोन्ही वेळा विवाहपूर्व समुपदेशन उपयोगाचे ठरते.

एकमेकांमधला मनमोकळा, आणि प्रामाणिक  संवाद हा नाते मजबूत करायला खूप उपयोगी पडतो. लग्नापूर्वी दोघांनी आपापली स्वप्ने एकमेकांना सांगितली पाहिजेत. पती पत्नी हे एक युनिट असायला हवे. कोणती गोष्ट घरातल्या मोठ्या माणसांना सांगायची आणि काय नाही सांगायचं याबद्दलही लग्नापूर्वी बोललं जायला हवं.

प्रायव्हसी च्या कल्पनांबद्दल पण आधी बोलले गेले पाहिजे. कारण हा पण कधी कधी वादाचा मुद्दा होऊ शकतो.

शैला आणि मुकुंद  --- नुकतेच लग्न झालेले जोडपे. मुकुन्दची बहिण लग्न झालेली, बहुतेक दर रविवारी त्यांच्या घरी यायची. आली की दर वेळी शैला आणि मुकुंद च्या खोलीत दुपारी झोपायला यायची. शैलाला  ते नाही आवडायचे. त्यांच्या प्रय्व्हासीवर गदा यायची.

तसेच दोघांनी आपापल्या घरातल्या माणसांबद्दल , त्यांच्या स्वभावाबद्दल एकमेकांशी बोललं पाहिजे. आणि प्रत्येक नात्याला एक भूतकाळ असतो, हे दोघांनी लक्षात घायला हवे. २५ वर्षे ज्या घरात मुलगी राहिली आहे त्या घरातल्या माणसांबद्दल तिला प्रेम वाटणारच हे जाणून घ्यायला हवे, आणि तरीही आपापल्या आई वडिलांना किती अंतरावर ठेवायचे हेही दोघांनी ठरवायला हवे. कारण प्रेमापोटी आई वडील ढवळाढवळ करत नाहीयेत न हे ही लक्षात घ्यायला हवे.

सगळ्या बाबतीतला खुलेपणा , प्रामाणीकपणा , नात्याचे बंध मजबूत करायला उपयोगी पडतो. कोणतीही माहिती लपवून ठेऊ नये. एकमेकांचे लहान लहान गोष्टींबद्दल कौतुक करायला हवे. एकमेकांसाठी छोट्या छोट्या गोष्टी लक्षात ठेऊन करायला हव्यात, म्हणजे त्या माणसाच्या दृष्टीकोनातून आपण स्पेशल आहोत असे वाटते आणि ही भावना खुपच सुखद असते.

सानिका आणि अद्वैत लग्न ठरल्यावर एकदा बाहेर जेवायला गेले होते. त्या दिवशी त्याला कळले की जिरेपूड घातलेले ताक तिला खूप आवडते. त्याने ते लक्षात ठेवले होते. एक दिवस ती त्यांच्या घरी जेवायला गेली होती.

अद्वैत च्या आईने तिला पानात ताक वाढले , अद्वैत पटकन उठला आणि आईला म्हणाला ,"जिरेपूड दे न तिला ताकात जिरेपूड आवडते. " सानिका ला खूप आनंद झाला. इतकी लहानशी गोष्ट त्याने लक्षात ठेऊन केली म्हणून.

अशा लहान लहान गोष्टी लक्षात ठेऊन केल्या की नात्यातली गंमत वाढीला लागते.

पण आणि त्यासाठी लग्न ठरायची वाट कशाला पाहायला हवी. आत्ताच 'आई' साठी असे वागून बघुया? काय?????